# महाराष्ट्र शासन

क्रमांकःअशैसं-२००९/प्र.क्र. २०२ /०९/का.१
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २०.१.२०१०.

प्रति,

सचिव,
तलत शिक्षण मंडळ,
कबाडीपुरा, औरंगाबाद - ४३१ ००१.

**विषय :- तलत शिक्षण मंडळ, औरंगाबाद या संस्थेस अल्पसंख्याक दर्जाबाबत प्रदान करण्याबाबत.**

महोदय,

आपल्या उपरोक्त विषयावरील दि.३०/१२/२००९ च्या पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दि. ४ जुलै, २००८ अन्वये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, ज्या शैक्षणिक संस्थांना दि. ११ जून, २००७ पूर्वी विशिष्ट आदेश किंवा पत्राद्वारे अथवा सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि. ११ जून, २००७ अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली आहे, अशा शैक्षणिक संस्थांनी अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेसाठी पुन्हा अर्ज सादर करावयाची आवश्यकता नाही. मात्र शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दि. ४ जुलै, २००८ मधील परिच्छेद (५) मध्ये धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून मान्यतेसंबंधात विहित केलेल्या अटी व शर्ती अशा संस्थांना लागू असतील.

उपरोक्त तरतूदीची प्रयोज्यता (Applicability) विचारात घेता, आपल्या शैक्षणिक संस्थेस शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग यांच्याकडून शासन पत्र, दि.२५ मार्च, १९९१ अन्वये अल्पसंख्याक दर्जा प्रदान केला असल्याने आपल्या शैक्षणिक संस्थेकडून चालविण्यास येणाऱ्या शाळा व इतर अभ्यासक्रमांकरिता अल्पसंख्याक दर्जा मिळण्यासाठी राज्य शासनाकडे नव्याने अर्ज सादर करावयाची आवश्यकता नाही. मात्र आपल्या शैक्षणिक संस्थेने शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का-१, दि. ४ जुलै, २००८ मधील परिच्छेद (५) मध्ये विहित केलेल्या अटींचे व शर्तींचे सातत्याने व विनिर्देशपुर्वक पालन करणे बंधनकारक आहे.

आपला,

( खालिद बी. अरब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०.
शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.